# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/१४/२०१६/ ३५१ | दिनांक- ३०.०६.२०१६

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/१४/२०१६

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. मिनेश वसंत घोंडगे,<br>रो. हा. नं. ६, माधव रो हाउस,<br>हनुमान नगर, विक्रीकर भवन शेजारी,<br>पाथर्डी फाटा, नाशिक,<br>पिन नं. ४२२०१०. |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | १२.०४.२०१६ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | १०.०५.२०१६ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | ०९.०६.२०१६ |

**<u>मागितलेली माहिती:-</u>**

१. *आयोग स्थापन झाल्यापासून विद्युत नियामक आयोग मुंबई हा केंद्रीय विद्युत (विज) अधिनियम २००३ नुसार कायदा तयार करतात, त्यानुसार "राज्य आयोगाचा विनियम करण्याचा अधिकार कलम नंबर १८१ मध्ये नमुद करण्यात आलेला आहे, परंतु वि. नि. आयोगाने वितरक परवानाधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठयाचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण विनिमय २०१४ मध्ये विद्युत पुरवठा सुरू करणेचा कालावधी केंद्रीय विद्युत (विज) अधिनियम २००३ नुसार कलम १८१ नुसार केला आहे परंतु भरपाईचे निश्चितकरन मध्ये वितरकाने कृतीच्या मानकांची पुर्तता न केल्यास देय भरपाई आयोगाने १०० रु प्रती आठवडयास किंवा त्याच्या भागास ठरवलेली आहे, सदर देय भरपाईची रक्कम आयोगाने कोणत्या कायदयाचा आधार घेऊन ठरवलेली आहे त्याचा खुलासा व्हावा*

२. *जर देय भरपाईची रक्कम केंद्रीय विज कायदा २००३ मध्ये आयोगाने कायदा करण्याचा अधिकार कलम १८१ नुसार ठरवलेली असेल तर कलम १८१ मधील कोणत्या उपकलमात आयोगाला विद्युत पुरवठा एक महीन्यात सुरु न केल्यास दंड ठरवण्याचा अधिकार आहे त्याचा खुलासा व्हावा.*

३. *विज नियामक आयोग मुंबई यांनी पुरवठयांची घटना / कार्य तयार केले आहे त्यात आयोगाला केंद्रीय विद्युत (विज) अधिनियम २००३ नुसार विद्युत पुरवठा किती दिवसात सुरू करावा हे आयोगाला ठरवण्याचा अधिकार आहे. परंतु, वितरक परवानाधारकाने विद्युत पुरवठा आयोगाने ठरवून दिलेल्या कालावधीत न केल्यास आयोगाने दंडाची (भरपाईची) तरतुद कोणत्या कायदयांचा आधार घेऊन केली आहे, अथवा सदर दंड (भरपाई) १०० रु विलंबाच्या प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास ठरवलेली आहे ती रक्कम ठरवण्यासाठी आयोगाने कोणते कायदे, कोणते निकष वापरून अथवा कोणते अधिकार वापरुन सदर १०० रु प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास हि रक्कम ठरवून दिलेली आहे त्याचा योग्य खुलासा व्हावा.*

**<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>**

सदर अर्जात मुद्दा क्रमांक १ ते ३ मध्ये उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, अर्जदाराने विचारलेली माहिती स्पष्टीकरण या स्वरुपात असल्यामुळे केंद्र शासनाच्या Ministry of Personnel, Public Grievances & Information

can not include within its fold answers to the question Why which would be same thing as asking the reason for a justification for a particular thing. The PIO cannot expect to communicate to the citizen the reason why a certain thing was done or not done in the sense of a justification are matter within the domain of adjudication authorities and cannot properly be classified as information. माहितीच्या व्याख्येत बसत नाही.

<u>प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-</u>

अपिलार्थी यानी माहीती अधिकारी अर्जातील माहिती नाकारल्यामुळे सबब अपिल करीत आहे असे नमुद केले आहे.

<u>आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत) :-</u>

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. २२.०६.२०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांनी आपले निवेदन सादर केले.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अधिकाराचा अर्ज माहिती अधिकारी यांना दि. १२.०४.२०१६ रोजी प्राप्त झालेला असून त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०५.२०१६ रोजी अपिलार्थी यांना उत्तर/माहिती उपलब्ध करुन दिले आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील हे दिनांक ०९.०६.२०१६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झालेले आहे.

वरील अपीलावर दि. २२.०६.२०१६ रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली, असे माहिती अधिकारी यांनी सांगीतले. माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचे निवेदन ग्राहय धरुन व अपिलातील उपस्थित मुददे व मागीतलेली माहिती या सर्व बाबींवर विचार करुन, वरिल अपील ही गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ ते ३ नुसार त्यांच्या दिनांक १२.०४.२०१६ च्या अर्जाला नाकारल्याचे म्हटले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ ते ३ मध्ये *भरपाईचे निश्चितकरण मध्ये वितरकाने कृतीच्या मानकांची पुर्तता न केल्यास देय भरपाई आयोगाने १०० रु प्रती आठवडयास किंवा त्याच्या भागास ठरवलेली आहे, सदर देय भरपाईची रक्कम आयोगाने कोणत्या कायदयाचा आधार घेऊन ठरवलेली आहे त्याचा खुलासा व्हावा असे म्हटले आहे हा खुलासा स्पष्टीकरणात्मक असल्यामुळे माहिती अधिकारी यांना खुलासा करता आला नाही.*

अपिलार्थी यांनी *केंद्रीय विज कायदा २००३ मध्ये आयोगाने कायदा करण्याचा अधिकार कलम १८१ नुसार ठरवलेली असेल तर कलम १८१ मधील कोणत्या उपकलमात आयोगाला विद्युत पुरवठा एक महीन्यात सुरु न केल्यास दंड ठरवण्याचा अधिकार आहे त्याचा खुलासा व्हावा असे म्हटले आहे. करीता* अपिलार्थी यांना स्पष्टीकरणाकरीता कलम १८१ च्या तरतुदीची प्रत जोडण्यात येत आहे.

अपिलार्थी यांच्या मुदा क्रमांक ३ अन्वेय त्यांनी *वितरक परवानाधारकाने विद्युत पुरवठा आयोगाने ठरवून दिलेल्या कालावधीत न केल्यास आयोगाने दंडाची (भरपाईची) तरतुद कोणत्या कायदयांचा आधार घेऊन केली आहे, अथवा सदर दंड (भरपाई) १०० रु विलंबाच्या प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास ठरवलेली आहे ती रक्कम ठरवण्यासाठी आयोगाने कोणते कायदे, निकष वापरुन अथवा अधिकार वापरुन सदर १०० रु प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास हि रक्कम ठरवून दिलेली आहे त्याचा योग्य खुलासा*

*व्हावा.असे विचारले आहे. सदरहू मुद्याला कायदे, निकष व अधिकार याचे स्पष्टकरण देणे माहिती अधिकारी यांच्या कर्तव्याच्या कक्षेत येत नसुन ते माहिती अधिकार कायद्याशी सुध्दा सुसंगत नाही.*

करिता माहिती आधिकारी यांनी पारीत केलेल्या निर्णयात हस्तक्षेप करण्याची गरज नसल्याचे दिसून येते. करिता सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

<u>निर्णय</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(अनिलकुमार उके)
उपसंचालक (विधी) तथा
प्रथम अपीलीय अधिकारी.

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ.